शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर

दालन क्र. १७, जिल्हा परिषद पालघर इमारत, कोळगाव, बोईसर रोड, पालघर (प.) ४०१४०४
ईमेल आयडी :- edu.palghar@gmail.com कार्यालय दुरध्वनी क्रमांक :- ०२५२५-२०५४११

-: उमेदवारांना सूचना :-

TAIT २०२५ पवित्र पोर्टल भरती प्रक्रिया २०२६ अंतर्गत पालघर जिल्हयाकरिता Conversion Round मध्ये उपलब्ध झालेल्या इ.१ ते ५ व इ. ६ ते ८ गटातील एकूण २७३ उमेदवारांचे समुपदेशन दिनांक १२/१०/२०२६ रोजी घेण्यात आले आहे.

सदर समुपदेशनामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पसंतीनुसार तालुका व शाळांची निवड केली असुन त्यांचे पदस्थापना आदेश तालुकास्तरावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

तरी समुपदेशन झालेल्या सर्व उमेदवारांनी (समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेले वगळून उदा. प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त, दिव्यांग इ.) उर्वरित उमेदवारांनी त्यांच्या **पदस्थापनेचे मूळ नियुक्ती आदेशाची प्रत दिनांक-२२/१०/२०२६ रोजी पासून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत त्यांनी निवडलेल्या तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयामध्ये गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन संबंधित शाळेवर रुजू व्हावे.**

-: समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उमेदवारांसाठी सुचना :-

१. समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उमेदवारांचे लाभाचे मुळ प्रमाणपत्र वितरित केलेल्या संबंधित सक्षम प्राधिका-यांकडून सदर प्रमाणपत्राची वैधता पडताळणी या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतरच संबंधित उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

(मनोज रानडे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

Scanned with OKEN Scanner